रे.के.नं.३९/२०२१
नि. क्र.६६

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ ची जबानी**
**माझे नाव** – प्रविण दत्ताराम कदम
**वय वर्षे** –३९, **पद**– वरीष्ठ लिपीक
**नेमणूक**– चिपळूण आगार, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी

**मी सत्य प्रतिज्ञेवर असे कथन करतो की,**

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीम.एस.आर.वनकर यांचेमार्फत सुरु.**

ऑगष्ट २०१९ मध्ये इंधन लिपीक या पदावर चिपळूण एस.टी. डेपो येथे कार्यरत होतो. माझ्या कामाचे स्वरूप डिझेलच्या नोंदी घेणे आहेत. दि.१७.१८.२०१९ रोजी आगार व्यवस्थापक संदिप पाटील डिझेल टँकर तपासत होते. त्यांनी डिझेल टँकरचे तीन कप्पे रिकामे केले. शेवटचा कप्पा रिकामा होत असताना त्यांच्या सोबत मी डिझेलच्या टँकरजवळ गेला असता असे निदर्शनास आले की, टँकरच्या टाकीमध्ये काहीतरी पडत असल्याचा आवाज आला. आम्ही दोघे सोबत असल्यामुळे तो आवाज मीही ऐकला. टँकर चालक कांबळे यांना डिझेल टँकरची टाकी खोलायला लावली.

२. त्यावेळी डिझेल टँकरच्या टाकीमध्ये डिझेल पडत असताना दिसले. आम्ही चालकाला डिझेल कोठून पडत आहे याची विचारणा केली. त्यावेळी त्याने मला माहीत नाही असे सांगितले. त्या चालकाने डिझेल टँकरवरील टाकीमधून डिझेल चोरी करण्याच्या उद्देशाने टँकरच्या टाकीमध्ये साडले होते. आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी क्र.१ हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.एस.ए.भोसले यांचे तर्फे सुरु**

**३.** सन २०१० मध्ये एस.टी. महामंडळात लिपीक टंकलेखक या पदावर रुजू झालो. त्यावेळी माझ्याकडे काही दिवस डिझेल व काही दिवस स्टोअर अशी कामगीरी दिली होती. ऑगष्ट २०१९ मध्ये माझ्याकडे केवळ इंधन लिपीक म्हणून काम होते. त्यामध्ये काही कारणास्तव कर्मचारी कमतरता असेल तर मला इतर टेबलवर देखील काम करावे लागत होते. ऑगष्ट २०१९ मध्ये मला इंधन लिपीक व्यतिरीक्त इतर टेबलवर काम करायची वेळ आली नाही. माझे काम बसमध्ये भरलेल्या इंधनाची नोंद घेणे, टँकर तपासले असल्याच्या नोंदणी घेणे, इतर पत्रव्यवहार करणे, वाहनाचे अॅव्हरेज काढणे इ. होते.

**४.** माझ कामाचे स्वरूप नऊ तासाचे असते. एस.टी.डेपोचा इंधन पंप चोवीस तास चालू असतो. कर्मचारी कमतरतेमुळे दोन शिफ्टमध्ये काम चालते. ऑगष्ट २०१९ मध्ये दोन लिपीक, ऑफ रिलीव्हर रजा आलटून पालटून व इतर कर्मचारी ऑफ रिलीव्हर होते. माझी शिफ्ट संपल्यानंतर दुसऱ्या कर्मचाऱ्याला मी माझा पदभार सोपावत असतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी टाकीमध्ये डिझेल किती शिल्लक आहे त्याची मोजणी करत नाही.

**पश्न –** ज्यावेळी एका कर्मचाऱ्याची शिफ्ट संपते त्यावेळी दुसऱ्या कर्मचाऱ्याला पदभार सोपविताना टाकीमध्ये डिझेल किती शिल्लक आहे त्याची मोजणी करत नाही ?

**उत्तर –** ज्योवळी शिफ्ट संपते त्यावेळी टाकीची डिप घेतली जाते व संध्याकाळी एकदा मोजणी केली जाते.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी टँकर लोडींग/अनलोडींग केले जाते त्यावेळी डेपो मॅनेजर हजर असणे आवश्यक नाही. टँकरचे अनलोडींग करण्यासाठी साधरण दिड तास लागतो. या टँकरचे देखील अनलोडींग करण्यासाठी साधारण दिड तास

लागला. इंधन लिपीकाकडून इंधन नोंदणी घेताना चूक झाल्यास वरीष्ठांकडून कारणे दाखवा नोटीस येते. आमचे वरीष्ठ डेपो मॅनेजर असून तशी नोटीस पाठवणे त्यांचे काम आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या इंधन लिपीकाकडून इंधन नोंदणी घेताना चूक झाली, त्याला वाचवण्यासाठी म्हणून डेपो मॅनेजर संदिप पाटील यांनी खोटी तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, इंधन अनलोड करताना डेपो मॅनेजर हजर असण्याची आवश्यकता नाही तेथे इंधन लिपीक हजर असणे आवश्यक आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या इंधन लिपीकाकडून झालेली चूक वाचवण्यासाठी डेपो मॅनेजर त्यांच्या केबिनमधून टँकरजवळ हजर झाले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे.

**उलटतपास पुर्ण**.
**फेरतपास नाही**.

श्रवणोत्तर स्विकृती.
सही/-
(वाय.सी. पाटील )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, व
न्यायादंडाधिकारी वर्ग-१, चिपळूण

दिनांक -२१/०७/२०२६
चिपळूण.

**<u>- प्रमाणपत्र -</u>**

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ पुराव्यामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| न्यायालयाचे नाव | सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी. |
| पुरावा टंकलेखीत दिनांक | २१.०७.२०२६ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | २१.०७.२०२६ |
| पुरावा अपलोड केलेले दिनांक | २१.०७.२०२६ |